नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/१०/२०२५ ( सोमवार )**

---

## २४ तासात जबरी चोरीचा गुन्हा उघड, ३ आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन अरोली** :— पोलीस स्टेशन अरोली येथे दिनांक ११/१०/२०२५ रोजी गुलशन रमेशलाल गोपलानी, वय ४९ वर्षे, रा शांतीनगर,गुरूनानक वार्ड भंडारा जि.भंडारा यांनी तक्रार नोंदविली की, फिर्यादी त्यांच्या अशोक लेलॉन्ड मालवाहू चारचाकी वाहन क्र. एमएच ३६ एए २३२५ ने चालक नामे राहुल गणेश पाटील, वय ३१ वर्षे, रा.आंबेडकर वार्ड भंडारा याचे सह किराणा सामान आजुबाजुचे गावातील दुकानात व मौजा धर्मापुरी येथील दुकानात पोहचवुन त्यांचे कडून किराणा मालाचे नगदी २,४०,०००/—रूपये घेवुन आपले अशोक लेलॉन्ड मालवाहू चारचाकी गाडी क्र. एमएच ३६ एए २३२५ ने चालकसह आपले गावी भंडारा येथे जात असतांना मौजा धर्मापुरी शिवारात मोपेड गाडीवर बसुन ०३ अनोळखी इसम यांनी फिर्यादीचे वाहन थांबवुन फिर्यादी व फिर्यादीचे ड्रायव्हरला रॉडनी मारहान करून फिर्यादीचे गाडीचे कंडक्टर बाजुचे काच तोडून फिर्यादीचे जवळुन नगदी २,४०,०००/—रू.जबरीने चोरून नेले तसेच फिर्यादीचे गाडीचे काच तोडून ५,०००/— रूपयाचे नुकसान केले.अश्या फिर्यादिच्या तोंडी रिपोर्ट वरून अज्ञात आरोपीतांविरूध्द कलम ३०९(४), ११८(१), ३२४(२), ३(५) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचा तपास अरोली पोलीस करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांच्या पथकाने सुध्दा समांतर तपास सुरू केला. दिनांक १२/१०/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर गुन्ह्यात तपासा दरम्यान भंडारा येथे जावुन गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पध्दतीने तपास करून सदर गुन्हयात फिर्यादीच्या वाहनाचा

चालाक आरोपी १) राहुल गणेश पाटील याला ताब्यात घेवुन विचारपुस केली. तांत्रिक पुराव्यावरून चालकासह आरोपी २) देवा राजरतन चंद्रिकापुरे, वय २० वर्ष रा. वर्टी भंडारा ,३) आरोपी नामे भागवत अमृत वर्मा, वय २३ वर्ष रा. डेप्युटी सिग्नल, नागपूर आणि अजुन एका आरोपी यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न केले. पोलीसांनी दयानंद पार्क, भीम चौक, जरीपटका, नागपुर या ठिकाणी सापळा रचून आरोपी क्रं १ आणि २ यांना ताब्यात घेतले सदर आरोपींकडे गुन्ह्याबाबत सखोल विचारपूस केली असता त्यांनी अरोली हद्दीमध्ये धर्मपुरी येथे यातील फिर्यादी हे त्यांचे चालकासह त्यांचे मालवाहू वाहनाने किराणा मालाचे पैसे घेऊन अरोली ते भंडारा जात असताना चालक नामे राहुल पाटील रा.आंबेडकर वार्ड भंडारा  याच्याशी संगणमत करून व पूर्वनियोजित कट रचून त्यांचे वाहन रस्त्यात थांबवून वाहनाचे काच फोडून फिर्यादीस लोखंडी रॉड  मारहाण करून फिर्यादी कडील नगदी पैशाची बॅग,बरदस्तीने हिसकावून नेल्याचे कबूल केले.

**पोलीसांनी नमुद आरोपीतांकडुन १) रोख रक्कम २,४५,२५०/— रूपये ,२) एक बजाज डिस्कवर मोटर सायकल क्रमांक एम. एच. ३१ डी. एफ. ७९९० किंमत ७०,०००/— रूपये ३) दोन ॲड्रॉईड  मोबाईल किंमत २५,०००/— रूपये असा एकुण किंमती ३,४०,२५०/— रूपयांचा मुद्देमाल  जप्त केला आहे. नमुद गुन्हयात फिर्यादीचे मालवाहु वाहनाचा चालक नामे १) राहुल गणेश पाटील, रा. आंबेडकर वार्ड, भंडारा, २) देवा राजरतन चंद्रिकापुरे, रा. वर्टी भंडारा आणि ३) भागवत अमृत वर्मा , रा. डेप्युटी सिग्नल, नागपूर यांना अटक करण्यात आली असुन आरोपी दिनांक  १६/१०/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मध्ये आहे.**




स्थानिक गुन्हे शाखाचे तपास पथक

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. एकुण ४,१६,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त, कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :—दिनांक १२/१०/२०२५ रोजी कळमेश्वर पोलीसांना गोपनिय बातमीदाराने माहीती दिली आहे कि, पोस्टे कळमेश्वर हद्दीमध्ये मौजा निंबा रोड ताकसांडे याच्या शेतात काही इसम ५२ तासपत्त्यांवर पैसे लावुन हारजीत चा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकुन आरोपी नामे १) अश्विन संजय गनवीर, वय ३१ वषे, २) सुदत्त सदानंद चहादे, वय ३२ वर्षे, ३) विशाल मोरेश्वर सातपुते,वय ४१ वर्षे तिन्ही रा हुडकेश्वर रोड नागपुर ४) आशिष श्रिकृष्णराव नाकाडे, वय ५८ वर्षे, रा बेसा रोड मानेवाडा नागपुर जि.नागपुर, यांना ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना जागीच पकडले तसेच ५) मारूती सुझुकी स्विफ्ट कार क्र एम एच ४६

एक्स ५२४३ चा चालक आरोपी आणि ६) होन्डा मेस्ट्रो गाडी क्र एम एच ४९ एव्ही ५८५७ चा चालक आरोपी हे घटनास्थळावरून वाहन सोडुन पळुन गेले.

**पोलीसांनी आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तास पत्ते व रोख रक्कम २६,५०० /—रूपये , मारूती सुझुकी स्विफ्ट कार क्र एम.एच. ४६ एक्स ५२४३ कि. ३,५०,०००/—रूपये, होन्डा मेस्ट्रो मोपेड क्र एम.एच. ४९ एव्ही ५८५७ कि. ४०,०००/—रूपये असा एकुण कि. ४,१६,५००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद ६ आरोपीतांवर पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे म.जु.का. कलम १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने